तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, दि. ११ डिसेंबर २०२४

आतील पानावर
पान २ – मल्लिकाने ब्रेकअपबाबत केला खुलासा
पान ३ – मी जितका व्यायाम केला तितकी जास्त जाड...
पान ४ – 'कांतारा'नंतर ऋषभ शेट्टी दिसणार बजरंग ...
पान ५ – जिलबी चित्रपटात पर्ण पेठे मुख्य भूमिकेत
पान ६ – शाहिदच्या 'अशत्थामा'ला ब्रेक



# 'घाटी' चित्रपटात अनुष्का शेट्टी

अभिनेत्री अनुष्का शेट्टी हिला तिच्या कसदार अभिनयासाठी ओळखले जाते. बाहुबली या चित्रपटामुळे तिचा देशभरात मोठा चाहतावर्ग निर्माण झाला आहे. अभिनेत्रीचा आगामी चित्रपट 'घाटी' लवकरच प्रदर्शित होणार आहे. निर्मात्यांनी या चित्रपटाचा फर्स्ट लुक पोस्टर सोशल मीडियावर शेअर केला आहे. या पोस्टरमध्ये अनुष्काच्या तोंडात सिगार, डोळ्यांमध्ये अंगार आणि रक्ताने माखलेला लुक चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. व्हिक्टिम क्रिमिनल आणि लिजेंड असे याच्या कॅप्शनदाखल म्हटले गेले आहे. घाटी या चित्रपटासोबत अनुष्काच आगामी चित्रपट 'द वाइल्ड स्कोरर'ची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात ती अभिनेत्री निला या व्यक्तिरेखेत दिसून येणार आहे. अनुष्काच्या 'घाटी' चित्रपटाचा टीझरही प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझर पाहून तिच्या चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. चाहते आता तिच्या या चित्रपटाच्या प्रदर्शनाची आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत. अनुष्का ही दक्षिणेतील नावाजलेली अभिनेत्री असून तिचे कोट्यावधीच्या संख्येत चाहते आहेत.



# अजय देवगण-अक्षय कुमारच्या चित्रपटात या अभिनेत्याची एन्ट्री?

अभिनेता अजय देवगण आणि अक्षय कुमार नुकतेच 'सिंघम अगेन' चित्रपटात पाहायला मिळाले होते. यानंतर आता ही जोडी पुन्हा एकदा एकत्र काम करताना दिसणार आहे. अलीकडेच अजयने पुढील चित्रपटात दिग्दर्शक म्हणून जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याचे जाहीर केले होते. तर अक्षय कुमार या सिनेमात प्रमुख भूमिकेत अभिनय करताना दिसणार आहे. या व्यतिरिक्त या चित्रपटात आणखी कोणते स्टार कास्ट पाहायला मिळणार याबाबत अनेकांना उत्सुकता होती. यातच आता अजयच्या या चित्रपटात आणखी एका लोकप्रिय अभिनेत्याची एन्ट्री होणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. अजय देवगण आणि अक्षय कुमार यांच्या सिनेमात विकी कौशलची वर्णी लागल्याचे म्हंटले जात आहे. हा सिनेमा कॉमेडी असणार असून अक्षय कुमार प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. विकी कौशलने आपल्या कामाने अजय देवगणचे मन




जिंकले आहे. हे लक्षात घेऊन, अजयने विचार केला की अक्षय कुमार आणि विकी कौशलची जोडी चित्रपटात रंजक ठरू शकते. याशिवाय अनेक वर्षांनी अजय देवगण दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहे. आता या सिनेमात अक्षयसोबत विकी कौशल कॉमेडी करताना दिसणार आहे. त्यामुळे अजय-विकी-अक्षय हे त्रिकूट एकत्र आल्यावर काय धमाल घडणार याकडे सर्वांचं लक्ष आहे. मात्र अद्याप याबाबत कोणतीही अधिकृतरित्या माहिती देण्यात आलेली नाही. पुढच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात होऊ शकते. कारण सध्यातरी अक्षय कुमार इतर सिनेमांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. तर २०२६ मध्ये सिनेमा थिएटरमध्ये रिलीज होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, 'सुहाग' (१९९४), 'खाकी' (२००४), 'इन्सान' (२००५), 'सिम्बा' (२०१८), 'सूर्यवंशी' (२०२१) आणि 'सिंघम अगेन' (२०२४) नंतर अजय देवगण आणि अक्षय कुमारची जोडी आणखी एका चित्रपटात दिसणार आहे. ज्यात आता विकी कौशल देखील असल्याची चर्चा आहे.



# मल्लिकाने ब्रेकअपबाबत केला खुलासा

बॉलिवूड अभिनेत्री मल्लिका शेरावतने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र बराच काळ सिनेसृष्टीपासून दुर राहिल्यानंतर तिने पुन्हा एकदा मनोरंजन सृष्टीत कमबॅक केले आहे. सध्या ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. परदेशात राहत असताना ती एका मुलाला डेट करत होती. मात्र आता त्यांचे ब्रेकअप झाले आहे.

याबाबत तिने एका मुलाखतीत खुलासा केला आहे. ती म्हणाली की, हो माझे ब्रेकअप झाले आहे. खूप काळापासून मी सिरिल ऑक्सेनफेंसला डेट करत होते. मात्र आता आमचा ब्रेकअप झाला आहे. आम्ही वेगळे झालो आहोत. आताच्या काळात चांगला जोडीदार शोधणे खूपच कठीण आहे. मला याबद्दल जास्त काही बोलायचे नाही. पण आता मी सिंगल आहे. इतकी वर्षे झाली, मी अजूनही वाट पाहत आहे. कदाचित मी खूप अपेक्षा करत आहे. लग्नसंस्थेबाबत मल्लिका म्हणाली, मी लग्नसंस्थेचा विचारच करत नाही. हा फक्त त्या दोन लोकांचा निर्णय आहे. त्यामुळे तो फक्त त्यांनीच घ्यावा.

मल्लिका शेरावतचा सिरिल ऑक्सेनफेन्स हा बॉयफ्रेंड होता. हा फ्रान्सचा नागरिक असून बिझनेस मॅन आहे. मल्लिका आणि तो पॅरिसमध्ये राहायचा. रिअल इस्टेटमध्ये त्यांची मोठी गुंतवणूक आहे.

दरम्यान, अलिकडेच मल्लिका 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' या चित्रपटात पाहायला मिळाली. राजकुमार राव आणि तृप्ती डिमरी यांनी यात मुख्य भूमिका साकारल्या होत्या. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवण्यास यशस्वी ठरू शकला नाही.

# 'जेलर'च्या सीक्वलची लवकरच घोषणा

रजनीकांत यांचा गाजलेला 'जेलर' सिनेमा चांगलाच गाजला. या सिनेमात रजनीकांत यांच्या वेगळ्या तरीही संवेदनशील भूमिकेचं चांगलंच कौतुक झालं. २०२३ साली आलेला हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगलाच गाजला. आता 'जेलर'च्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी. रजनीकांत यांच्या गाजलेल्या 'जेलर' सिनेमाचा सीक्वल लवकरच येणार असून त्याविषयीची अधिकृत घोषणा येत्या काहीच दिवसांमध्ये करण्यात येणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, 'जेलर' सिनेमाची टीम एक प्रोमो शूट करणार आहे. या प्रोमोमध्ये प्रेक्षकांना 'जेलर २'ची अधिकृत तारीख कळणार आहे. 'जेलर २'मध्ये रजनीकांत पुन्हा एकदा मुथुवेल पनडीयनच्या भूमिकेत दिसणार आहे.

'जेलर २'मध्ये रजनीकांतसोबत आणखी कोणते कलाकार दिसणार हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे. असंही सांगितलं जातंय रजनीकांत यांच्या वाढदिवशी 'जेलर २'ची अधिकृत घोषणा करण्यात येईल. गेल्या वर्षभरापासून रजनीकांत यांचे चाहते आणि 'जेलर' सिनेमावर प्रेम करणारे प्रेक्षक 'जेलर २'च्या अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत.

अखेर आज ट्विटरवर 'जेलर २' ट्रेंडिंगवर आल्याने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. 'जेलर'मध्ये रजनीकांत यांच्यासोबत मीरना मेनन, वीनायकन, डॉ.शिवा राजकुमार या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली होती. आता 'जेलर २'मध्ये रजनीकांतसोबत हेच कलाकार दिसणार की वेगळे याचा उलगडा लवकरच होईल.






# मी जितका व्यायाम केला तितकी जास्त जाड...

बॉलीवूड अभिनेत्री विद्या बालन तिच्या 'भूल भुलैया ३' या चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. 'भूल भुलैया' चित्रपटात विद्याने साकारलेल्या मंजुलिकाची सार्यांनाच भुरळ पडली होती. त्यानंतर आता तिसर्या भागात ती पुन्हा एकदा मंजुलिकाच्या भूमिकेत झळकली आहे. मध्यंतरीच्या काळात विद्या बालनचे वजन तुलनेने वाढले होते. त्यामुळे तिला ट्रोलिंगचासुद्धा सामना करावा लागला होता. मात्र, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या भूल भुलैया ३ मध्ये विद्याचा एकदम आधीसारखा बारीक लूक पाहायला मिळत आहे. विद्याने याबद्दल नुकतीच एक मुलाखत दिली आहे. त्यात तिने बारीक होतानाचा अनुभव शेअर केला आहे.

मी अधी असा विचारही केला नव्हता अशा भूमिका मला बारीक झाल्यानंतर मिळत आहेत. 'द डर्टी' चित्रपटानंतर मी पुन्हा एकदा माझ्या नवीन आयुष्याला सुरुवात केली. या चित्रपटाच्या काळात माझे शरीर फार जास्त स्थूल झाले होते. शरीर जाड होत असल्याने त्यावेळी मला अनेकांनी ट्रोल केले. मात्र, या काळात एक वेळ अशी आली की, माझे शरीर कोणत्याही गोष्टींना प्रतिक्रिया देत नव्हते, असे विद्या म्हणाली. विद्याने पुढे तिच्या वर्कआउटबद्दलसुद्धा सांगितले आहे. ती म्हणाली, मला हार्मोनल समस्या निर्माण झाल्या होत्या. या समस्या सतत वाढत होत्या. त्यावर उपचार सुरू असतानादेखील माझे वजन कमी होत नव्हते. व्यायाम केल्यास वजन कमी होण्याऐवजी ते जास्त वाढत होते. त्यामुळे मी मनातून खचत होते. किती काही केले तरी शरीरावरील सूज कमी होत नव्हती, असे विद्या म्हणाली. मुलाखतीत पुढे तिने सांगितले, माझे शरीर जसे आहे तसे मी सुरुवातीला स्वीकारले. कारण- मला हे समजले होते की, वजन कमी करण्यासाठी फक्त व्यायाम, जेवण आणि पाणी पुरेसे नाही. त्यासाठी तुमच्या मनानेदेखील तुम्हाला साथ दिली पाहिजे. त्यामुळे मी माझ्या शरीराचा स्वीकार केला. त्यावर प्रेम केले. मनातून शरीरावर होणारे सर्व बदल मी आनंदाने स्वीकारले. त्यानंतर मी डॉक्टरांचादेखील सल्ला घेतला. माझ्या शरीरावर माझे प्रेम आहे. आता ते मला जसे हवे, तसे नाही. त्यामुळे मी त्याचा द्वेष करू शकत नाही, हे मी स्वत: माझ्या मनाला समजावले. सर्व गोष्टी स्वीकारण्याआधी मी फार स्ट्रेसमध्ये असायचे. हा सर्व स्ट्रेस शरीरावर दिसत होता आणि त्यामुळेच माझे वजन कमी होत नव्हते, असेही विद्या बालन म्हणाली आहे. मुलाखतीत विद्याने झोयाने केलेल्या प्रशंसेचा उल्लेख केला आहे. झोया म्हणाली होती की, मी या रूपात सर्वाधिक सुंदर दिसते. मी हेच वाक्य मनात साठवून ठेवले आणि स्वत:वर प्रेम केले. काही वर्षे आधी माझे वजन जास्त असल्याने अनेक कामे करता आली नाहीत. आता वजन कमी झाल्यानंतर मी विचारही केला नव्हता अशी कामे मला मिळत आहेत, असेही विद्याने यावेळी सांगितले. 'भूल भुलैया ३'मध्ये विद्याला पुन्हा मंजुलिकाच्या भूमिकेत पाहून चाहचे खूश झालेत. त्यात विद्याने धकधक गर्ल माधुरी दीक्षितबरोबर नृत्य सादर केले आहे. या गाण्यात माधुरीसमोर विद्या फिकी पडेल की काय, अशी शंका नेटकऱ्यांना होती. मात्र, विद्याने माधुरीच्या तोडीस तोड नृत्य सादर केले आहे. त्यामुळे प्रेक्षकांकडून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# रणवीर सिंगच्या 'डॉन ३' चे प्रदर्शन लांबणीवर

रणवीर सिंगने आपल्या अभिनय कारकिर्दीत अनेक प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत. पण त्यांनी कोणत्याही चित्रपटात आधीच प्रसिद्ध व्यक्तिरेखा साकारली नाही. रणवीरला ही संधी डॉन ३ या चित्रपटातून मिळाली. या चित्रपटात तो मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या मालिकेच्या पहिल्या दोन चित्रपटांमध्ये शाहरुख खान डॉनच्या भूमिकेत दिसला होता. आता ही भूमिका रणवीर सिंग साकारणार आहे. यासाठी रणवीरला याआधीही अनेक ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. शाहरुखने साकारलेली व्यक्तिरेखा तो चांगल्या प्रकारे साकारू शकणार नाही, असे प्रेक्षकांचे म्हणणे आहे. या चित्रपटाचे शूटिंग या वर्षी सुरू होणार होते. आता त्याचे शूटिंग वाढवण्यात आल्याची बातमी आहे. नुकतीच बातमी आली आहे की डॉन ३ पुढील वर्षी सुरू होणार आहे. रणवीर सिंग पुढील वर्षी या चित्रपटाचे शूटिंग करणार आहे. फरहान अख्तर हा चित्रपट बनवत आहे. डॉन ३ या चित्रपटात रणवीरसोबत कियारा अडवाणीची भूमिका करण्यात आली आहे. या चित्रपटासाठी तो परफेक्ट चॉईस असल्याचे अनेकांचे मत आहे. ती या चित्रपटाला ग्लॅमरचा टच देणार आहे. नुकतीच एक बातमी आली होती की, विक्रांत मॅसीलाही डॉन ३ चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेची ऑफर देण्यात आली आहे. तो नुकताच 'द साबरमती रिपोर्ट' या चित्रपटात दिसला होता. डॉन सीरीजचे चित्रपट त्यांच्या दमदार क्शनसाठी ओळखले जातात. अशा परिस्थितीत डॉन ३ मधील क्शन सीन देखील आंतरराष्ट्रीय स्तरावरचे असतील असे सांगण्यात येत आहे. या चित्रपटात रणवीर सिंग अप्रतिम क्शन करताना प्रेक्षकांना पाहायला मिळेल. रणवीर देखील क्शन करण्यात कधीच मागे नाही, त्याने त्याच्या अनेक चित्रपटांमध्ये भरपूर क्शन सीन्स दिले आहेत.

दाक्षिणात्य अभिनेता चिरंजीवींच्या नावाचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश करण्यात आला आहे. २२ सप्टेंबर रोजी, अभिनेत्याला त्याच्या ४५ वर्षांतील १५६ चित्रपटांमधील ५३७ गाण्यांमध्ये २४ हजार डान्स स्टेप्स सादर केल्याबद्दल त्यांना अधिकृतपणे सन्मान मिळाला. चिरंजीवी यांनी १९७८ मध्ये भारतीय फिल्म इंडस्ट्रीमध्ये आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली होती. चिरंजीवी कोनिडेलाला मिळालेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्च्या सर्टिफिकेटवर लिहिली होतं की, भारतीय चित्रपटसृष्टीतील सगळ्यात यशस्वी अभिनेता आणि डान्सर चिरंजीवी उर्फ मेगा स्टार. यावेळी त्यांच्यासोबत बॉलिवूड अभिनेता आमिर खान देखील तिथे उपस्थित होता. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डीनं द वर एक पोस्ट

## अभिनेता चिरंजीवींच्या नावाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

शेअर करत चिरंजीवीला शुभेच्छा देत तेलुगू लोकांसाठी ही गर्वाची गोष्ट असल्याचे म्हटले आहे. तर टीपीसीसी अध्यक्ष महेश गौड, मंत्री कोमाटिरेड्डी वेंकट रेड्डी, उत्तम कुमार रेड्डी आणि इतर कलाकारांनी देखील चिरंजीवी यांना सोशल मीडियावर शुभेच्छा दिल्या आहेत. चिरंजीवी यांनी 'पुनाधिरल्लू' या चित्रपटाद्वारे आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली. पण, 'मन वुरी पांडावुलु' हा त्यांचा पहिला प्रदर्शित झालेला चित्रपट होता. १९८२ मध्ये रिलीज झालेला 'इंतलो रामय्या वीधिलो कृष्णय्या' हा चित्रपट हिट ठरला. तर 'कैदी' या चित्रपटामुळे चिरंजीवी लोकप्रिय झाले. लवकरच ते 'विश्वंभरा' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. हा चित्रपट १० जानेवारी २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## 'कांतारा'नंतर ऋषभ शेट्टी दिसणार बजरंग बली अवतारात



'जय हनुमान' या बहुचर्चित चित्रपटाचे पोस्टर रिलीज झाले आहे. या चित्रपटात अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता ऋषभ शेट्टी हनुमानाच्या भूमिकेत दिसणार आहे. अलीकडेच निर्मात्यांनी 'जय हनुमान'मधून ऋषभ शेट्टीची पहिली झलक चाहत्यांना दाखवली आहे. 'जय हनुमान' चित्रपटाच्या प्रोडक्शन हाउस मिथ्री ऑफिशियलने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टरमध्ये ऋषभ शेट्टी भगवे कपडे परिधान करून रामाची मूर्ती छातीजवळ धरून बसलेला दिसत आहे. त्याचा हा वेगळा लुक पाहून चाहत्यांकडून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ऋषभच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, त्याने अनेक कन्नड चित्रपटांचे लेखन, दिग्दर्शन आणि अभिनयही केला आहे. २०२२ मध्ये त्याने 'कांतारा' चित्रपट बनवला. 'कंतारा'मध्ये ऋषभ शेट्टीने अभिनयासोबतच दिग्दर्शनाची जबाबदारीही घेतली होती. हा चित्रपट केवळ कन्नड भाषेतच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रचंड यशस्वी झाला. या चित्रपटासाठी ऋषभ शेट्टीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आणि सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपटाचा किताबही मिळाला. फिल्मी दुनियेत येण्यापूर्वी ऋषभने अनेक प्रकारची कामे केली. ऋषभने फिल्म इंडस्ट्रीत क्लॅप बॉय, स्पॉट बॉय, असिस्टंट डायरेक्टर आणि इतर प्रकारचे काम केले. या संघर्षानंतर अभिनेत्याला २०१२ मध्ये आलेल्या 'तुघलक' चित्रपटात मुख्य भूमिका मिळाली. यानंतर त्याने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. २०१६ मध्ये त्याच्या दिग्दर्शित 'रिकी'ने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. यानंतर त्यांनी 'किरक पार्टी' हा रोमँटिक ड्रामा चित्रपट दिग्दर्शित केला, जो हिट ठरला.



## नागा चैतन्यने घातलाय दुसऱ्या लग्नाचा घाट

पुढील महिन्यात ४ डिसेंबर रोजी नागा चैतन्य अभिनेत्री शोभिता धुलिपालासोबत अन्नपूर्णा स्टुडिओमध्ये दुसऱ्यांदा लग्नगाठ बांधणार आहे. दरम्यान, नागा चैतन्य याची पहिली पत्नी अभिनेत्री समंथा रुथ प्रभूने तिच्या घटस्फोटाबद्दल उघडपणे भाष्य केलं आहे. या दोघांनी २०१७ मध्ये लग्न केले आणि ४ वर्षांनी २०२१ मध्ये दोघांनीही एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेऊन चाहत्यांना आश्चर्यचकित केले. मात्र, आजपर्यंत त्यांच्या घटस्फोटाचे कारण त्यांच्या चाहत्यांना कळू शकलेले नाही.


दरम्यान, तिच्या लग्नाबद्दल अनेकदा चर्चा करताना अभिनेत्रीने त्यांचे वैवाहिक जीवन किती विषारी बनले आहे याचे संकेत दिले होते. अलीकडेच, पुन्हा एकदा सामंथा तिच्या घटस्फोटाबद्दल उघडपणे बोलली. नागा चैतन्यपासून तीन वर्षांच्या घटस्फोटानंतर, समंथा रुथ प्रभूने सांगितले की, तिने तिच्या आयुष्यासाठी अतिशय विचारपूर्वक केलेल्या योजना पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत. ती म्हणाली, '२०२१ मध्ये माझ्यासोबत जे काही घडले त्यानंतर मला माझ्या भविष्याकडून कोणतीही अपेक्षा नाही. माझ्या सर्व काळजीपूर्वक मांडलेल्या योजना फसल्या आहेत, त्यामुळे आता जे काही घडेल त्यासाठी मी तयार आहे. मला माहित आहे की मी प्रत्येक परिस्थितीत माझे सर्वोत्तम देईन. अलीकडे घटस्फोटानंतर महिलांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याविषयी सांगताना समंथा म्हणाली, 'आपल्या समाजातील पितृसत्ताक विचार खूप खोलवर आहे. जेव्हा कधी काही चूक होते तेव्हा स्त्रीला अनेकदा अधिक टीकेला आणि लाजिरवाण्याला सामोरे जावे लागते. मी असे म्हणत नाही की पुरुष हे करत नाहीत, ते देखील करतात, परंतु महिलांना या परिस्थितीला अधिक सामोरे जावे लागते आणि हे केवळ ऑनलाइनच नाही तर वास्तविक जीवनातही घडते. अशा अनेक गोष्टी माझ्याबद्दल बोलल्या गेल्या ज्या पूर्णपणे खोट्या होत्या. बोलत असताना ती पुढे म्हणाली, 'मला आठवतं जेव्हा परिस्थिती खूप वाईट होती आणि लोक खूप खोटं पसरवत होते, तेव्हा मी स्वतःशी एक गोष्ट बोलली. असे बरेच वेळा होते जेव्हा मला समोर येऊन सांगावे लागले की जे सांगितले जात आहे ते खरे नाही आणि मला सत्य सांगायचे आहे.

तुमच्या कुटुंबियांना आणि मित्रांना सत्य माहीत आहे या वस्तुस्थितीसोबत तुम्ही जगू शकत नाही का? लोकांना तुमच्याबद्दल खोट्या गोष्टी वाटत असतील तर ते ठीक नाही का? हे ठीक आहे'. समंथा इंडस्ट्रीत १४ वर्षांपासून आहे आणि या वर्षात तिने ५० हून अधिक तमिळ आणि तेलुगू चित्रपटांमध्ये काम केले आहे. आज ती टॉपची अभिनेत्री आहे.



# जिलबी चित्रपटात पर्ण पेठे मुख्य भूमिकेत

आगामी काळात मराठी कलाविश्वात नवनवीन धाटणीचे आणि वैविध्यपूर्ण चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. 'जिलबी' हा चित्रपट १७ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. अभिनेता प्रसाद ओक आणि स्वप्नील जोशी या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र झळकणार आहेत. त्यांच्या जोडीला पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य या कलाकारांनी स्वत:च्या अभिनयाने मनोरंजनाच्या या 'जिलबी'चा खुसखुशीतपणा वाढवला आहे. या चित्रपटाचे पोस्टर सादर करण्यात आले असून यातील कलाकारांचा लूक लक्ष वेधून घेणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन नितिन कांबळे यांनी केले आहे. या चित्रपटात शिवानी सुर्वे देखील प्रमुख भूमिका साकारणार आहे. पोस्टरमध्ये प्रसाद, स्वप्नील आणि शिवानीचा जबरदस्त लुक पहायला मिळत आहे. आता या तिघांभोवती नेमकं कसलं जाळं पसरलंय याचा उलगडा चित्रपट पाहिल्यावरच होणार आहे. स्वप्नील आणि प्रसाद एकत्र झळकणार असल्याने प्रेक्षकांच्या मनातील उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटाची कथा अन् संवादलेखन मच्छिंद्र बुगडे यांनी केले आहे. तर छायांकन गणेश उतेकर यांचे आहे. रुपा पंडित आणि राहुल दुबे हे याचे सहनिर्माते आहेत.



# मराठी सिनेमे डब का होत नाहीत?

नाना पाटेकर मराठी, हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते. त्यांचे विचार, त्यांचा अफाट ज्ञान, बोलण्याची शैली, एकापेक्षा एक संवाद सगळंच अद्भूत आहे. वयाच्या ७३ व्या वर्षीही ते प्रेक्षकांवर भुरळ घालत आहेत.

'नटसम्राट' सिनेमातील त्यांच्या कामाची स्तुती करावी तितकी कमीच आहे. लवकरच त्यांचा 'वनवास' सिनेमा रिलीज होणार आहे. यानिमित्ताने ते अनेक ठिकाणी मुलाखती देत आहे. एका मुलाखतीत त्यांनी मराठी सिनेमा डब का होत नाही अशी खंत व्यक्त केली. 'अमुक तमुक'ला दिलेल्या मुलाखतीत नाना पाटेकर म्हणाले, साऊथचे सिनेमे हिंदीत डब झालेले आपण पाहतो. मग मराठी सिनेमे हिंदीत का डब होत नाहीत. साऊथचे काही अतिशय टुकार सिनेमे जे कसे काय चालले आणि का पाहावे असा प्रश्न पडतो ते सिनेमे ओटीटीवर येतात. मराठीत इतकं सकस कंटेंट आहे मग ते का डब होत नाही. काकस्पर्श का डब नाही झाला? काय अप्रतिम काम केलं आहे त्यात कलाकारांनी. आपण व्यवहारात कमी पडतोय का याचा विचार करायला हवा. ते पुढे म्हणाले, फुलवंती नावाचा सिनेमा नुकताच आला. पाहताना काय गोड वाटत होता.व्हिज्युअली किती छान दिसत होतं. मग असे सिनेमे का प्रमोट होत नाहीत? व्हायलाच पाहिजेत. आता सिनेमा करताना केवळ मराठीपुरती मर्यादित कथा निवडायची नाही. मराठी सिनेमे इतके छान असताना ते डब का नाही होत? नटसम्राटचे हक्क साऊथने घेतले ना. सगळीकडे हिंदीच नट्या का लागतात. का नाही आपली अमृता, प्राजक्ता, सई यांना का नाही प्रमोट करत? त्यांच्यात ताकद आहे करायला हवं.

# अग्नि चित्रपटात सई ताम्हणकर



प्राभिनेत्री प्राइम व्हिडिओने स्वत:चा आगामी हिंदी चित्रपट 'अग्नि'च्या प्रदर्शीत केला आहे. एक्सेल एंटरटेनमेंट प्रॉडक्शनचा हा चित्रपट राहुल ढोलकिया यांनी दिग्दर्शित केला असून त्यांनीच कहाणी लिहिली आहे. या चित्रपटात प्रतीक गांधी आणि दिव्येंदु शर्मा हे कलाकार दिसून येत आहेत. तसेच यात सई ताम्हणकर मुख्य भूमिकेत आहे. चित्रपटाचा टीझर सादर करण्यात आल्यापासून चित्रपटाची उत्सुकता लागली होती. यात प्रतीक आणि दिव्येंदु दमदार भूमिकेत दिसून येत आहेत. अग्निशमन जवानांवर आधारित हा चित्रपट आहे.

आगीच्या ज्वाळांदरम्यान अग्निशमन दलाचे जवान हे इतरांच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावत असतात. चित्रपटत सैयामी खेर, सई ताम्हणकर, जितेंद्र जोशी, उदित अरोडा, कबीर शाह हे दमदार कलाकार आहेत. हा चित्रपट ६ डिसेंबर रोजी प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित झाला आहे. अग्निशमन जवानांचे अतूट साहस दर्शविणारा हा चित्रपट असल्याचे उद्गार निर्माते रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी काढले आहेत.

# ऋषिकेश जोशी पाणीपुरी चित्रपटात



हरहुन्नरी ऋषिकेश जोशी, आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयाने कमालीचे लोकप्रिय आहेत. सोबत त्यांनी लेखक आणि दिगदर्शक म्हणूनही मनोरंजनसृष्टीवर स्वतंत्र ठसा उमटवला आहे. सध्या मात्र एका वेगळ्याच कारणाने ते प्रसिद्धीच्या झोतात आलेले आहेत. गोल्डमॅन म्हणून सध्या ते सगळीकडे वावरतायेत. त्यांच्या अंगावरील दागिन्यांमुळे त्यांना ही आवड कधी निर्माण झाली ? हा प्रश्न साऱ्यांना पडला आहे. आगामी 'पाणीपुरी' या चित्रपटातील 'बबन' ही व्यक्तिरेखा ऋषिकेश जोशींनी साकारली आहे. या बबनला अंगावर दागिने घालून मिरवण्याची हौस आहे. एस. के प्रॉडक्शन निर्मित आणि रमेश चौधरी यांचे लेखन-दिग्दर्शन असलेला 'पाणीपुरी' हा मराठी चित्रपट नुकताच चित्रपटगृहात दाखल झाला आहे.

संजीवकुमार अग्रवाल या चित्रपटाचे निर्माते आहेत तर सहनिर्माते चंद्रकांत ठक्कर, अनिकेत अग्रवाल आहेत. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना ऋषिकेश जोशी सांगतात, अंगावर किलोभर सोनं घालून फिरणारा 'बबन' हे एक मजेशीर पात्र आहे. बबनच्या गळयात सोन्याच्या चैनी असतात. हातात गोल्डचे कडे, ब्रेसलेट आणि घड्याळ असते. मला स्वत:ला ही भूमिका करताना मजा आली. त्यामुळे प्रेक्षकही ही भूमिका एन्जॉय करतील असा विश्वास ते व्यक्त करतात.

या चित्रपटात ऋषिकेश जोशी, यांच्यासोबत विशाखा सुभेदार, भारत गणेशपुरे,प्राजक्ता हनमघर, कैलास वाघमारे, शिवाली परब, प्रतिक्षा जाधव, सचिन बांगर, अनुष्का पिंपुटकर,अभय गिते आदि कलाकार दिसत आहेत. चित्रपटाचे छायांकन आणि संकलन सिद्धेश संतोष मोरे यांचे आहे. चित्रपटाची पटकथा-संवाद संजय नवगिरे यांनी लिहिले आहेत. संगीत अजित परब तर पार्श्वसंगीत अमर मोहिले यांचे आहे. गीतकार मंदार चोळकर यांच्या गीतांना गायक मंदार आपटे, अजित परब यांचे स्वर लाभले आहेत.



# 'लव्ह अँड वॉर'मध्ये आलिया आणि रणबीर दिसणार रेट्रो लूकमध्ये

प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर आणि अभिनेत्री आलिया भट्ट मुख्यभूमिकेत दिसणार आहे. यात रणबीर कपूर आणि आलिया भट्ट नव्या अवतारात दिसणार आहेत. या बिग बजेट चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले असून सेटवरील रणबीर आणि आलियाचा लूक ऑनलाइन लीक झाला आहे. 'लव्ह अँड वॉर'च्या सेटवरून रणबीर कपूर आणि आलिया भट्टचे लीक झालेले फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. लीक झालेल्या फोटोंमध्ये रणबीर आणि आलिया रेट्रो लूकमध्ये दिसत आहेत. जिथे रणबीरला विंटेज स्टाईलच्या मिशा आहेत आणि तो पांढरा शर्ट, काळी पँट आणि काळ्या टायमध्ये दिसत आहे. तर आलिया व्हाइट आउटफिटमध्ये दिसत आहे. आलियाच्या विंटेज हेअरस्टाइलने लोकांचे लक्ष वेधून घेतले. त्याच वेळी, विकी कौशल देखील चित्रपटात रेट्रो लूकमध्ये दिसणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. याशिवाय या चित्रपटात शाहरुख खान हा कॅमिओ करणार आहे. शाहरुख खान सध्या 'किंग' सिनेमाच्या तयारीत व्यस्त आहे. याआधी किंग खानने रणबीरच्या 'ए दिल है मुश्किल' या चित्रपटात ताहिर आणि 'ब्रह्मास्त्र'मध्ये मोहन भार्गवचा कॅमिओ केला होता. दरम्यान, भन्साळी यांचा 'हा चित्रपट २०२६ च्या ईदला रिलीज होणार आहे. संजय लीला भन्साळी आणि रणबीर कपूर हे १७ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येत आहेत. याआधी भन्साळी यांनी रणबीरला 'सावरिया' सिनेमात संधी दिली होती.

# जे लोक मला आवडत नाहीत..


अभिनेत्री मलायका अरोरा आणि अभिनेता अर्जुन कपूर आता एकत्र नाहीत. गेले ६ वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर दोघे अधिकृतपणे वेगळे झाले आहेत. अर्जुन कपूरने 'सिंघम अगेन'च्या प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान ब्रेकअपच्या वृत्ताला दुजोरा दिला होता. तेव्हापासून मलायका अरोरा सतत सोशल मीडियावर क्रिप्टिक पोस्ट शेअर करत आहे. अलीकडेच मलायका अरोराने मुलगा अरहानसोबत नवीन आपल्या जीवनाची सुरुवात केली आहे. नुकतंच, मलायका अरोरा आणि अरहान यांनी मिळून मुंबईत एक रेस्टॉरंट उघडले आहे. एका मुलाखतीत मलायकाने सांगितले होते की, जेव्हा ती तिच्या मुलासोबत देश आणि जगभर फिरते तेव्हा वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन जेवणाची चव चाखते. तेथूनच हे रेस्टॉरंट सुरू करण्याची कल्पना सुचली. असं ती म्हणाली होती. अलीकडेच मलायका तिचा मुलगा अरहानसोबत या रेस्टॉरंटच्या बाहेर स्पॉट झाली होती. रेस्टॉरंट सुरू करण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली होती. तेव्हापासून सगळे मलायकाचे अभिनंदन करत आहेत. या खास प्रसंगी नवीन व्यावसायिक भागीदार जुळताना दिसले. खरं तर, मलायका अरोराच्या नव्या सुरुवातीमुळे चाहतेही खूप खूश आहेत. तिच्या ब्रेकअपची बातमी आल्यापासून अर्जुन कपूरला ट्रोलिंगला सामोरे जावे लागले आहे. दरम्यान, मलायकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. त्यांनी एक कोट शेअर केला आहे. त्यात लिहिले होते, 'जे लोक मला आवडत नाहीत त्यांची काळजी करायला माझ्याकडे वेळ नाही. जे लोक माझ्यावर प्रेम करतात त्यांच्यावर प्रेम करण्यात मी व्यस्त आहे'. खरंतर मलायका अरोरा आणि अर्जुन कपूरच्या मुलालाही या नात्याबद्दल माहिती होती. त्या दोघांसोबत अनेकदा दिसले. मात्र ब्रेकअपनंतर जेव्हा अरहान आणि अर्जुन समोरासमोर आले तेव्हा कोणीही काहीही बोलले नाही. सध्या मलायकाची ही पोस्ट चर्चेत आली आहे.



# शाहिदच्या 'अश्वत्थामा'ला ब्रेक



अभिनेता शाहिद कपूरचा 'अश्वत्थामा: द सागा कंटिन्यूज' या चित्रपटाची मार्च महिन्यात घोषणा करण्यात आली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन बी. रवी करत होते. मात्र आता या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. महान योद्धा अश्वत्थामा यांची महाकथा पडद्यावर आणणारा चित्रपट थांबवण्यात आला आहे. 'अश्वत्थामा: द सागा कंटिन्यूज' हा चित्रपट मेझॉन स्टुडिओसह निर्माता वासू भगनानी यांच्या पूजा एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली बनवला जात होता. पण बजेट ५०० कोटींहून अधिक झाले आणि बजेटची कमतरता आणि लॉजिस्टिक आव्हानांमुळे चित्रपट थांबवण्यात आला आहे. प्रॉडक्शन टीममधील एका सूत्राचा हवाला देत सांगण्यात आले की, प्रोजेक्टचे प्रमाण खूप मोठे होते. आंतरराष्ट्रीय कल्पनारम्य-क्शन चित्रपटांशी स्पर्धा करू शकेल असे काहीतरी बनवण्याची कल्पना होती. अश्वत्थाम्याचे चित्रीकरण अनेक देशांत होणार होते. पण आंतरराष्ट्रीय स्थळांवर शूटिंग करणे हे कठीण असल्याचे जाणवले. यासाठी बजेटमध्ये राहणे हे एक गंभीर आव्हान असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, वासू भगनानी आणि त्यांचे प्रोडक्शन हाऊस पूजा एंटरटेनमेंट आधीपासूनच वादात आहेत. अनेक प्रोजेक्ट्समध्ये काम केलेल्या कलाकारांची थकीत फी परत न केल्याचा आरोप निर्माता आणि त्याच्या प्रोडक्शन हाऊसवर आहे. त्यामुळे आता शाहिदच्या 'अश्वत्थामा: द सागा कंटिन्यूज' चित्रपटालाही ब्रेक लागल्याचे समोर आले आहे.



# गाण्यांच्या भाषेत भारतीय सिनेमा

**हिंदी चित्रपट आणि नृत्यांच्या परंपरेत वैविध्यता आहे. त्याच्या शेकडो प्रकारात गेल्या शतकापासून अनेक प्रयोग होत राहिले आहेत. त्यात शास्त्रीय संगीतावर आधारित नृत्यं जशी होती, तशीच पुढे पाश्चिमात्य रोंबासोंबा, ट्विस्ट, कॅब्रे डान्स अशा नृत्यशैलीचं आक्रमण झालं. त्याने आज इतकं वाईट हिंसक वळण घेतलं आहे की, 'मधुबन मे' राधिका नाचे रे'चेही आजच्या पिढीने प्रयोगशीलतेच्या नावाखाली विकृतीकरण केले आहे; जे तुम्ही शिल्पा शेट्टी नावाच्या एका अभिनेत्रीच्या कार्यक्रमात पाहू शकता. त्याला ती 'सुपर से उपर' म्हणून दाद देत असते.**

हिंदी सिनेसृष्टीचा पाया जरी मराठी माणसाने रचला असला, तरीही मराठी माणूस निर्माता म्हणून हिंदी चित्रपटसृष्टीच्या आसपासही आढळणार नाही. कारण हिंदी सिनेमाच्या कोटी कोटीच्या स्पर्धेत मराठी माणसाचा निभाव लागणंच कठीण आहे. त्यांच्यासाठी सिनेमाची तहान मालिकांवर आणि मालिकांची भूक नाटकावर भागवण्यासारखा प्रकार आहे. व्ही. शांताराम यांनी जे साध्य करून दाखवलं किंवा काही अंशी, काही काळ भगवानदादांनी आपला वचक निर्माण केला होता; तसा त्यानंतर रमेश देव, सचिन पिळगावकर, महेश कोठारे यांनी हिंदीत बऱ्यापैकी पाय रोवले असतानाही आर्थिक नुकसानीच्या भीतीने आधीच पळ काढला. त्या मानाने महेश मांजरेकरांनी आपल्या धाडसी स्वभावामुळे आणि हिंदीतील बड्या स्टार्सशी बऱ्यापैकी जुळवून घेतल्यामुळे सलमान खान व्हाया बिग बॉसपर्यंत मजल मारली. मराठीत ज्यांना आम्ही सुपरस्टार म्हणत होतो, त्यांनी हिंदीत फुटकळ भूमिका करून किरकोळ हंशावर नाव कमावलं व आपल्या मराठी सिनेमाची पत राखली.

अशाने मराठी माणूस पुन्हा कधीच हिंदीच्या मैदानात दंड थोपटून उभा राहणार नाही. त्यामुळे आम्हाला आमची 'माय मराठीच प्यारी' आहे, यावर खूश व्हायचं. खरं तर मराठी माणसाच्या हाती कुणी एकरकमी शंभर कोटी दिले तर तो हिंदीतील बड्या बड्या निर्मात्यांना लाजवेल असा, हिंदीच्या तोडीस तोड सिनेमा निर्माण करू शकेल. निशिकांत कामत एक असं व्यक्तिमत्त्व होतं; त्याला हिंदीतील मसाला फिल्मच्या निर्मितीची अचूक नस सापडली होती आणि ते त्यांनी सिद्ध करून दाखवलं होतं. आता नागराज मंजुळे तसा प्रयत्न करीत आहेत. फक्त त्यांचा हिंदीतील वातावरणात निभाव लागायला हवा.

आमचा मराठी सिनेमा आजही 'तंबू टॉकीज'मध्ये प्रदर्शित होण्याची वाट पाहतो. म्हणून मराठी माणसाने फक्त व्ही. शांताराम, भगवानदादा यांच्या कलाकृतींचं गुणगाण गात किती दिवस ढकलायचे? 'झनक झनक पायल बाजे' १९५५, 'नवरंग' १९५९, 'गीत गाया पत्थरोने' १९६४, 'सेहरा' १९६३, बूँद जो बन गयी मोती' १९६७, 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली' असे काही खास चित्रपट राज कमल कलामंदिरचे, संगीत नृत्यप्रधान चित्रपट म्हणून लक्षवेधी ठरले होते. यातील गाणी, नृत्यरचना नजरेसमोर ठेवून निर्माण केली गेली होती, जी गाणी ऐकत असताना चित्रपट पाहिलेल्यांना पुनः प्रत्ययाचा आनंद देत होती तर अभ्यासकांना या संगीत रचनाचा अर्थ काय असावा? हे जाणून घेण्यासाठी सिनेमा पाहण्याच्या मोहात पाडत होती. व्ही. शांताराम यांनी आपला एक खास चाहतावर्ग निर्माण केला होता. गोपीकृष्ण, संध्या, भगवानदादा यातील प्रमुख कलाकार होते तर संगीत वसंत देसाईंचं होतं. १९५५ साली निर्माण झालेल्या या चित्रपटाचं ६६ वर्षांपूर्वीच बजेट होतं अडीच कोटी रुपये! भारतीय रागदारीवर आधारित संगीत आणि त्याला साजेशी गोपीकृष्ण यांची नृत्यरचना, त्याचं आकर्षण वाढविण्यासाठी केलेली नेत्रदीपक रोषणाई व रंगसंगती यामुळे यातील गाण्यांनी प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केलं होतं. असा तो 'झनक झनक पायल बाजे' चित्रपटाचा थाट. दहा गाण्यांनी सजलेल्या या चित्रपटाची रंगत त्यामुळे जराही कमी होत नाही. कारण शांतारामजींनी आपल्या प्रेक्षकांना चित्रपट पाहण्याची शिस्त लावली होती. त्यामुळे परीक्षा तसा अभ्यास या न्यायाने प्रेक्षक मनाची तयारी करूनच चित्रपटाला येत असे. म्हणूनच नवरंग, गीत गाया पत्थरोने, सेहरा, बूँद जो बन गये मोती आणि जल बिन मछली नृत्य बिन बिजली असे राजकमलचे चित्रपट प्रेक्षकांना नृत्य व संगीताचा अविस्मरणीय आनंद देऊन गेले.

'जल बिन मछली नृत्य बिन बिजली' या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे शांतारामजींनी लक्ष्मीकांत-प्यारेलाल या नामांकित जोडीला आपल्या चित्रपटासाठी निमंत्रण दिले. राजकमलचे संगीत तोपर्यंत बऱ्यापैकी संयमित व वाद्यवृंद संयोजनाच्या मर्यादेत राहणारे होते. मात्र, 'जल बिन मछली...'च्या गाण्यांनी संगीत सौंदर्याच्या मर्यादा पार करून, ऑर्केस्ट्रामध्ये वाद्यांचे असे काही प्रयोग निर्माण केले. या चित्रपटापासून १९७१ साली प्रथमच स्टीरियॉफोनिक साऊंड सिस्टिम चा वापर करून राजकमल कला मंदिरचे अनुभवी रेकॉर्डिस्ट, मंगेश देसाईंनी त्यात आधुनिकता आणली होती. ते अत्याधुनिक ध्वनियंत्रणा असणाऱ्या थिएटरमध्ये ऐकताना ऑर्केस्ट्रात वाजविल्या गेलेल्या लहानसहान वाद्यांच्या परिणामाचाही आपण आनंद उपभोगू शकत होतो. आता या यंत्रणेचा इतका अतिरेक झाला आहे की, 'गाणं नको पण ती सिस्टीम आवर', असं म्हणावं लागतं.

व्ही. शांताराम यांच्या तालमीत तयार झालेले भगवानदादा, राज कपूर त्यांचा आदर्श. त्यांच्याच सल्ल्याने त्यांनी चेंबूरमध्ये आपला स्टुडिओ निर्माण केला. सिनेव्यवसायात त्यांनी पैलवानासारखे पाय रोवले. अगदी कमीत कमी बजेटमध्ये चित्रपट निर्माण करण्याची त्यांची हातोटी होती. असे त्यांनी बरेच चित्रपट निर्माण केले, पण आपल्या लयदार, पदलालित्य आणि चेहऱ्यावरील मिश्किल हावभावातून त्यांनी स्वतःचा 'भगवानदादा डान्स' फिल्म इंडस्ट्रीला दिला. अमिताभ बच्चन, गोविंदाने त्याचा वापर करीत त्यावर आपलं नाव कोरलं. सुरुवातीला मी काही विशिष्ट निर्मात्यांचा उल्लेख केला होता. ज्यांच्या हातात बॉलिवूडचा बाहुला आहे, ते त्याला आपल्या मनाप्रमाणे नाचवीत आहेत. त्यांच्या सिनेमात गाणी कितीही असोत, त्यातील एक आयटम साँग, कित्येक कोटी रुपये खर्च करून ते चित्रीत करणारच. कारण त्यांचा कथा पटकथेवर व दिग्दर्शकावर विश्वास नसतो. फराह खानने आजवरच्या आपल्या स्वस्तात स्वस्त बजेटमध्ये बसवून ते गाणं हिट करून दाखवलं. याचं श्रेय दिलं गेलं कतरिनाच्या बोल्ड सौंदर्याला आणि विशाल शेखरच्या संगीताला. त्यांनीच हे गाणं लिहिलं होतं. 'शीला की जवानी'ने उत्पन्नाचे सर्व विक्रम तोडले. गायिका सुनिधी चौहानला अनेक पुरस्कार मिळवून दिले. या गाण्यावर काही राज्यात बंदी होती. लखनौमध्ये या गाण्याला अश्लील म्हणून कोर्टापर्यंत जावं लागलं होतं. बँकॉक, थायलंड, चीनमधील शांघाय येथे गाण्याचं चित्रीकरण करण्यात आलं होतं. गाण्यावर अफाट खर्च केला गेला होता, पण तरीही चित्रपट आपटला. या गाण्यांच्या लोकप्रियतेचा जेव्हा विचार केला जातो, तेव्हा या बॉलिवूडवाल्यांना एकच सांगावसं वाटतं की, आता गाण्याची बरबादी बंद करा. कारण तुमच्या डफ्फर गाण्यांमुळे बॉलिवूडचं नाव तुम्ही बदनाम करीत आहात. 'बॉलिवूड' भारतीय सिनेमा आहे. त्याचा निदान भास तरी चित्रपटातून जगाला होऊ द्या. (लेखक, सिने समीक्षक आहेत.)

**रत्नाकर पिळणकर**

# 'पुष्पा २' ठरणार सर्वाधिक लांबीचा चित्रपट?




'पुष्पा २' प्रदर्शित होण्यासाठी आता फक्त ७ दिवस उरले आहेत. येत्या ५ डिसेंबरला हा चित्रपट संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. तब्बल तीन वर्षांपासून या चित्रपटाचं शूटिंग सुरू आहे. अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. याशिवाय पुष्पा अन् श्रीवल्लीची केमिस्ट्री सुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती.

'पुष्पा: द राइज'च्या यशानंतर आता लवकरच 'पुष्पा २: द रुल' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सुरुवातीला 'पुष्पा २' ऑगस्ट महिन्यात प्रदर्शित होणार होता. पण, तांत्रिक बाबींमुळे या सिनेमाचं प्रदर्शन मेकर्सकडून पुढे ढकलण्यात आलं. अल्लू अर्जुनने नुकतीच इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत चित्रपटाचं शूटिंग पूर्ण झाल्याचं सांगितलं आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये अल्लू अर्जुन आणि रश्मिकाने पाच वर्षांचा प्रवास आता संपला असल्याचं म्हटलं आहे. आता दुसर्या भागात कोणता 'पुष्पाराज' पाहायला मिळणार याचा उलगडा ५ डिसेंबरला होणार आहे. 'पुष्पा२' चित्रपटासाठी देशभरात डव्हान्स बुकिंगला सुरुवात होणार आहे. आजवर प्रभासच्या 'बाहुबली २'साठी रेकॉर्डब्रेक बुकिंग झाल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यानंतर यशच्या 'केजीएफ २'चा नंबर लागतो. यासाठी ८० कोटींहून अधिक डव्हान्स बुकिंग झालं होतं. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर राम चरण आणि ज्युनियर एनटीआर यांचा "RRR' सिनेमा आहे, यासाठी ५८ कोटींचं डव्हान्स बुकिंग करण्यात आलं होतं. आता 'पुष्पा २' साठी येत्या ३० नोव्हेंबरपासून डव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली आहे. या चित्रपटाचं बजेट ४०० कोटींच्या घरात आहे. त्यामुळे निर्मात्यांना "Pruha 2' रेकॉर्डब्रेक कमाई करून हजार कोटींच्या क्लबमध्ये प्रवेश करेल अशी आशा आहे. तसेच हा बहुचर्चित चित्रपट डव्हान्स बुकिंगमध्ये सुद्धा एक नवीन रेकॉर्ड करण्याची शक्यता नाकारता येत नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार 'पुष्पा २' हा देशातील सर्वाधिक लांबीचा चित्रपट असणार आहे. या चित्रपटाचा रनटाइम तब्बल ३ तास २१ मिनिटं असण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावर अनेक पोस्ट व्हायरल होत आहेत. नुकतंच शूटिंग संपल्याने चित्रपटाचा रनटाइम ३ तास २१ मिनिटांपर्यंत असेल असं बोललं जात आहे.

# ‘हिरामंडी २’ या दिवशी होणार प्रदर्शित?




बॉलिवूड अभिनेत्री ‘मनीषा कोईराला’ने संजय लीला भन्साळी यांच्या ‘हिरामंडी’ या डेब्यू वेब सीरिजमधून जोरदार पुनरागमन केले. अनेक स्टार्सची भूमिका असलेली ही मालिका १ मे रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली. पहिल्या सीझनपासून लोक दुसऱ्या सीझनबद्दल प्रश्न विचारत होते. आता मनीषा कोईराला हिने हिरामंडीच्या दुसऱ्या सीझनचे मोठे अपडेट दिले असून पुढील वर्षी त्याचे शूटिंग सुरू होणार असल्याचे सांगितले आहे. नुकत्याच एका मुलाखतीत मनीषा कोईराला हिरामंडी २ बद्दल म्हणाली, पुढच्या वर्षी त्याचे शूटिंग सुरू होईल. आम्ही सर्व परत येण्याची वाट पाहत आहोत. यादरम्यान मनीषाला जेव्हा विचारण्यात आले की, हिरामंडीच्या यशानंतर तिला आणखी प्रोजेक्ट्सच्या ऑफर आल्या का? यावर मनीषा म्हणाली की, काही स्क्रिप्ट्सवर चर्चा सुरू आहे. मात्र, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत आपण कोणतीही माहिती शेअर करणार नसल्याचे तिने स्पष्ट केले. यावेळी मनीषा कोईरालाने तिच्या चित्रपट प्रवासाविषयी सांगितले. ती म्हणाले की, ३० वर्षांपूर्वी लोकांचा असा विश्वास होता की चित्रपट उद्योग नकारात्मक आणि वाईट गोष्टींनी भरलेला आहे. पुढे सांगितले, त्यावेळी चांगल्या कुटुंबातील मुलींना चित्रपटसृष्टीत स्थान मिळवणे खूप कठीण होते. सौदागर आणि इतर काही चित्रपटांच्या यशानंतर त्यांच्या अभिनयावर विश्वास न ठेवणाऱ्या लोकांनी त्यांचे कौतुक करायला सुरुवात केली, असे सुद्धा अभिनेत्री म्हणाली. हिरामंडी हा भन्साळी यांचा मोठा प्रकल्प होता. जवळपास ६० हजार लाकडी फळ्या आणि धातूच्या फ्रेम्सने सेट उभारण्यासाठी ७०० कारागिरांच्या टीमने मुंबईच्या फिल्म सिटीमध्ये सात महिने काम केलं होतं. या मालिकेत मनीषा कोईराला, सोनाक्षी सिन्हा, रिचा चड्ढा, अदिती राव हैदरी, संजीदा शेख, शर्मीन सेगल, फरदीन खान, ताहा शाह बदुशाह, अध्यायन सुमन, शेखर सुमन आणि जेसन शाह यांसारखे अनेक कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसले होते.



## ‘चांद मेरा दिल’मध्ये अनन्या पांडे

करण जौहरने स्वत:च्या नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटात अनन्या पांडे दिसून येणार आहे. यात तिच्यासोबत लक्ष्य हा कलाकार मुख्य भूमिकेत असणार आहे. या चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर करण्यात आले आहे. हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे नाव ‘चांद मेरा दिल’ असेल. आम्ही एक अत्यंत प्रेमळ आणि भावुक प्रेम कहाणी आणणार आहोत. प्रेमात काहीसे वेडे व्हावेच लागते असे करण जौहरने पोस्टरच्या कॅप्शनदाखल नमूद केले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विवेक सोनी करणार आहे. अनन्या पांडेचा मागील चित्रपट कंट्रोल हा ओटीटीवर प्रदर्शित झाला होता. तर लक्ष्य हा स्वत:चा चित्रपट ‘किल’वरुन अत्यंत लोकप्रिय झाला आहे. ॲक्शनने भरपूर हा चित्रपट प्रेक्षकांना पसंत पडला होता. अनन्या ही जौहरची आवडती स्टारकिड असल्याने त्याने तिला अनेक चित्रपटांमधून संधी दिली आहे. अनन्याला बॉलिवुडमध्ये अद्याप स्वत:चे स्थान निर्माण करता आलेले नाही.

# राजकुमार रावने मानधनात केली वाढ?



अभिनेता राजकुमार राव ‘स्त्री २’ चित्रपटात अभिनेत्री श्रद्धा कपूरसोबत मुख्य भूमिकेत झळकला. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने मोठी कमाई केली. याशिवाय त्याच्या ‘श्रीकांत’, ‘मिस्टर आणि मिसेस माही’ आणि ‘विकी और विद्या का वो वाला व्हिडिओ’ चित्रपटाला प्रेक्षकांची चांगली पसंती मिळाली. ‘स्त्री २’च्या रेकॉर्डब्रेक यशानंतर राजकुमार रावने आपली फी वाढवल्याच्या बातम्या येत होत्या. त्याने त्याच्या फीमध्ये ५ कोटी रूपये वाढ केल्याचे वृत्त समोर आले आहे. यावर राजकुमार रावने प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, मी मानधनात वाढ केलेली नाही. निर्मात्यांवर दबाव टाकायला मी इतका मूर्ख नाही. मानधन एक वेगळी गोष्ट आहे जे सिनेमापेक्षा मोठं होऊ शकत नाही. सिनेमाच्या यशानंतर मानधन वाढवलंच पाहिजे हे गरजेचं नाही. मला आयुष्यभर काम करायचे आहे. म्हणूनच मी अशा भूमिका शोधतो ज्या मला आनंद देतील. याद्वारे राजकुमारने सर्व अफवांचं खंडन केलं आहे. लवकरच राजकुमार राव आता आगामी ‘मालिक’ या सिनेमात दिसणार आहे. या सिनेमातील राजकुमारचा फर्स्ट लूक समोर आला असला तरी अद्याप रिलीज डेटची घोषणा करण्यात आलेली नाही. स्त्री २ चित्रपटाबद्दल बोलायचे तर, हा ‘स्त्री’चा सीक्वल होता. या चित्रपटात श्रद्धा कपूर, पंकज त्रिपाठी, सुनील कुमार, अभिषेक बॅनर्जी, अपारशक्ती खुराना यांसारखे कलाकार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन अमर कौशिक यांनी केले होते.